स्थायी समितीच्या **शनिवार दिनांक 02–04–2016** रोजी **सायंकाळी 04–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. बंडू उर्फ सुधीर राऊत** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 3. | मा. श्री. राजू भाऊराव नागूलवार | सदस्य |
| 4. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्या |
| 5. | मा. श्रीमती संगीता कळमकर | सदस्या |
| 6. | मा. श्री. रामदास गुडधे | सदस्या |
| 7. | मा. श्री. संजय महाकाळकर | सदस्या |
| 8. | मा. श्री. सुरेश जग्यासी | सदस्या |
| 9. | मा. श्रीमती कुमूदिनी कैकाडे | सदस्य |
| 10. | मा. श्रीमती इफ्तीखर अशरफू | सदस्य |
| 11. | मा. सौ. दिव्या धुरडे | सदस्या |
| 12. | मा. श्री. गणेश उर्फ मुन्ना पोकूलवार | सदस्य |
| 13. | मा. सौ. अश्विनी जिचकार | सदस्या |
| 14. | मा. श्री. अनिल धावडे | सदस्य |
| 15. | मा. सौ. सरिता तिवारी | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. जगदीश ग्वालबंशी | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

**1.** श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
**2.** श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

सभापतीः– बैठकीला सुरूवात करीत आहे. मी सर्वप्रथम आज बैठकीला जे अधिकारी वेळेवर उपस्थित नाहीत त्यांची नोंद घेण्यात यावी. याच्यानंतर होणा–या बैठकी या वेळेवर होणार आहे. हे लक्षात ठेवून अधिका–यांना त्याप्रकारचे उत्तर देण्याची वेळ येवू नये अशी माझी विनंती आहे. अधिकारी येथे अनुपस्थित आहेत हे उपस्थितीवरून लक्षात येत आहे. ज्या अधिका–यांना खुपच महत्वाचे काम असेल त्यांनी एक तास अगोदर कळविले तर आमची काही हरकत नाही ते न कळविता अनुपस्थित राहत असतील तर हे बैठकीकरिता योग्य नाही हे या बैठकीचे निर्देश आहे.

<u>ठराव क्रमांक 45ः–</u> कस्तुचंदपार्क येथे दिनांक 07.04.2016 ला महानगरपालिके तर्फे नुतन वर्षे पूर्व एड्स जनजागरण कार्यक्रमाचे व्यवस्थेबाबात रू. 28,03,890/– च्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता व प्राप्त निम्नतम मे. ए. एन. नागभिडकर यांची निविदा 39.86 टक्के कमीची, रू. 16,86,259/– किमंतीची निविदा मुजरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 46ः–</u> **नागपूर शहरातील स्वयंचलित वाहतूक नियंत्रके व ब्लिंकर्सच्या वार्षिक सुस्थिती व दुरुस्ती करण्याकरीता रु. ८७,४४,५००/- च्या प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचा** प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**खर्च पद क्र. A22501530814 मधून करण्यात येईल. काम नियमित ई-निविदा बोलावून करण्यात येईल.**

<u>ठराव क्रमांक 47ः–</u> नागपूर महानगरपालिका, आरोग्य विभाग अंतर्गत पावसाळयापूर्वी झोननिहाय नाले सफाई करीता ऐस्कॉव्हेटर (07 टन), ऐस्कॉव्हेटर (10 टन), ऐस्कॉव्हेटर (20 टन) व ऐस्कॉव्हेटर/लोडर इत्यादी मशिनरी भाडे तत्वावर लावण्याच्या अनुषंगाने भाडेदर निश्चित करण्याकरिता ई–निविदा मागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 48ः–</u> प्रभाग क्र. ४१ अ रामाजी वाडी येथे श्रध्दा निवास ते सरस्वती शाळा ते श्री चरडे यांचे घरापर्यंत सिमेंट काँक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त ८ निविदांपैकी मे. संतोष आर खरपकर यांची प्राकलनिय दरांपेक्षा ०.५ टक्के प्रतिशत ने कमी दरांची रू. ४८,८०,७३८/– रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 49ः–</u> प्रभाग क्रं. ४४ येथे लिटल रोज कॉन्व्हेंन्ट ते राजेन्द्र नगर चौक ते नागनदी पर्यंत स्ट्रॉम वॉटर ड्रेनचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे.सि.व्ही.नायडु, यांची प्राकलनीय दरापेक्षा ०.०६ टक्के कमी दराची रू. ९१,२३,२४५/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 50ः–</u> प्रभाग क्र. ३ ब संजीवनी क्वार्टर, संगम नगर व संघर्ष नगर येथे सिमेंट काँक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त ८ निविदांपैकी मे. ए. बी. राऊत यांची प्राकलनिय दरांपेक्षा १. ०० टक्के प्रतिशत ने कमी दरांची रू. २९,६४,८२२/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 51ः–</u> जकात/स्थानिक संस्था कर विभागातील भंगार सामानाची निविदा मंजूरीबाबत. मनपाचे विविध विविध जकात नाक्यांवरील असलेले भंगार साहित्य एकत्रित करुन जकात नाक्यांचे गोडावून मध्ये ठेवण्यात आले आहे. हे भंगार साहित्य ब-याच कालावधीचे व फार जूने झाले असल्याने या भंगार साहित्याची विल्हेवाट लावण्याचे दृष्टीने आवेदन मागवून व्हॅल्युअर कडून मुल्यांकन करण्यात आले होते. त्यानुसार व्हॅल्युअर यांनी एकूण भंगार साहित्याचा बाजार भावाचा अंदाज घेवून अंदाजित एकूण रु.४,३३,०१८/- चे मुल्यांकन

केलेले होते. या मुल्यांकनाच्या आधारावर हया भंगार साहित्याची निविदा मागवून विल्हेवाट लावण्याकरीता स्थायी समिती ठराव क्र.३३०, दिनांक १७.१२.२०१७ अन्वये मंजूरी प्रदान करण्यात आली होती. त्यानुसार संबंधीत कामाची दिनांक २०.०२.२०१६ ला ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा कालावधीमध्ये इच्छुक भंगार साहित्य खरेदी करणा-या व्यक्तींकरीता भंगार साहित्य पाहण्याकरीता वेळ दिलेला होता. या कालावधीत आठ इच्छुक व्यक्तींनी भंगार सामानाची पाहणी केली. परंतु निविदा भरुन सादर करण्याच्या कालावधीपर्यंत कोणीही निविदा सादर न केल्यामुळे संबंधीत निविदेला दिनांक १०.०३.२०१६ पर्यंत प्रसिध्दी देवून मुदतवाढ देण्यात आली होती. मुदतवाढीच्या कालावधीत परत इच्छुक ४ व्यक्तींनी भंगार साहित्याची पाहणी केली परंतु यापैकी दोनच खालील निविदाकारांनी/व्यक्तींनी निविदा सादर केल्या.

१. तनवीर ट्रेडर्स, औलियानगर, उमरेड रोड, नागपूर (२) एफ.के. ट्रेडर्स, ताजबाग, नागपूर

मा. महापौर यांनी दिनांक १६.०२.२०१६ रोजी मा. आयुक्त यांचे दालनात घेतलेल्या सभेमध्ये शहरबस वाहतुकीकरीता नियुक्त होणा-या बस ऑपरेटर ला कार्यशाळा तसेच डेपो निर्मितीसाठी वाडी, खापरी, पारडी जकात नाक्यांच्या जागा त्वरीत उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश दिलेले आहे.

करीता संबंधीत कामाच्या निविदेला आढळून येणारा अल्प प्रतिसाद लक्षात घेता संबंधीत कामाला परत फेर निविदा मागविल्यास योग्य प्रतिसाद मिळेलच अशी शक्यता वाटत नाही. त्यामुळे जकात नाक्यांवर असलेले भंगार साहित्य अजून ब-याच कालावधीपर्यंत पडून राहील व त्याची विल्हेवाट लागणार नाही. करीता उपरोक्त प्राप्त दोन निविदाकारांच्या निविदा उघडण्यात आल्या असता विभागाने दिलेल्या रु.४,३३,०१८/- offset value पेक्षा जास्त मे.तनवीर ट्रेडर्स यांनी रु. ४,७१,०००/- व मे. एफ. के. ट्रेडर्स यांनी रु.४,७०,०००/- च्या किंमतीत सदरहू भंगार साहित्य खरेदी करण्याची इच्छुकता दर्शविलेली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता सदरहू प्राप्त निविदेला तसेच मे. तनवीर ट्रेडर्स यांनी सादर केलेली किंमत स्थायी समिती व्दारा ठराव क्र. ३३० दि. १७.१२.२०१७ अन्वये मंजूर केलेल्या offset value पेक्षा सर्वात जास्त असल्याने त्यांची निविदा मान्य करण्याच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीनी मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 52</u>:— मौजा — हुडकेश्वर या भागातील १) गुरूकृपा नगर, बेलेकर ले—आऊट, न्यु ओम नगर, चंद्रभागा नगर, इंगोले नगर येथील रस्त्याचे डांबरीकरण तसेच २) गुरूकृपा नगर, बेलेकर ले—आऊट, न्यु ओम नगर, चंद्रभागा नगर, इंगोले नगर येथील रस्त्याचे खडीकरणसह डांबरीकरण (ब्लाक — जी प्राईड बार ते निलगगन अपाटमेच्या मधातील रस्ते) करण्याचे कामास्तव मागविण्यात आलेल्या एकूण १४ निविदाकारांपैकी मे. ओ. जी बजाज यांची द्वित्तीय निम्नतम निविदा मुळ प्राकलनीय दरापेक्षा ४.३३ टक्के अधिक दराच्या निविदा राशी रु. २,०२,७८,०९१ /— रकमेच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 53</u>:— मौजा — हुडकेश्वर या भागातील १) सावरबांधे ले—आऊट, चंद्रकिरण नगर, येथील रस्त्याचे डांबरीकरण तसेच २) सावरबांधे ले—आऊट ते जबलपुर यांचे घरा पासुन मेंढे यांचे घरापर्यंत रस्त्याचे खडीकरणसह डांबरीकरण (ब्लाक — सी, संत कृपा हॉर्डवेअर ते सेलेब्रेशन लॉन च्या मधातील रस्ते) करण्याचे कामास्तव मागविण्यात आलेल्या एकूण १२ निविदाकारांपैकी मे. एस के मेहता ॲन्ड कंपनी यांची प्रथम निम्नतम निविदा मुळ प्राकलनीय दरापेक्षा ४.३३ टक्के अधिक दराच्या निविदा राशी रु. १,१२,७३,०५६/— रकमेच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 54</u>:– मौजा – हुडकेश्वर या भागातील १) चंदनशेष नगर, ताजेश्वर नगर, धांडे ले–आऊट, गुरूकृपा नगर येथील रस्त्याचे डांबरीकरण तसेच २) चंदनशेष नगर, ताजेश्वर नगर, धांडे ले–आऊट, गुरूकृपा नगर रस्त्याचे खडीकरणसह डांबरीकरण (ब्लॉक – एफ मानमोडे ते हिरूळकर ज्वेलर्स ते महालक्ष्मी आपार्टमेट) करण्याचे कामास्तव मागविण्यात आलेल्या एकूण १३ निविदाकारांपैकी मे. मुकेश कंन्स्ट्रक्शन यांची प्रथम निम्नतम निविदा मुळ प्राकलनीय दरापेक्षा ४.३३ टक्के अधिक दराच्या निविदा राशी रु. २,१०,८६,३९५/– रकमेच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 55</u>:– प्रभाग क्र. ७२ अ अंतर्गत प्रभाग विमानतळ येथील विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. पी.एम.ए. कन्स्ट्रक्शन हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा ३.५ टक्के अधिक दराची निविदा रूपय ४६,५६,६९७/– रकमेची निम्नतम निविदा स्थायी समिती ठरावाचा ठराव क्र. ४८१ दिनांक १२.०१.२०१६ स्विकृत करण्यात आलेली होती तथापी सदर्हु रस्त्याचे काम मंजूरी नुसार ३० लक्ष पर्यंत पुर्ण करण्यात आले असून उर्वरीत १६.५ लक्षाचे काम प्रभाग क्र. ७२ अ चे एच. बि. स्टेट सोनेगांव येथे प्रस्तावित होते. परंतु सदर ठिकाणी नागपूर सुधार प्रन्यास तर्फे डांबरीकरण करण्यात आले आहे. करीता या कामा ऐवजी मा. नगरसेविका यांचे मौका बदल करण्याबाबत दिलेले पत्रानुसार सदर काम गजानन धाम पंचदीप सोसा. सहकार नगर भागात रस्ते खराब असल्यामुळे येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याकरीता त्याच कंत्राटदारां मार्फत उर्वरीत काम पूर्ण करण्यास मंजूरी तसेच कामाचा मौका बदलाच्या प्रस्तावास मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 56</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर